**रे. मु. नं. १३६/२०१२**
सीएनआरनं.महापु.१८-०००२९९-२०१२

## निशाणी क्र. ८० खालील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज वादी याने दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रुल १७ प्रमाणे दाखल केलेला आहे.

२. वादीने असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा दावा वादी याने साठे खतावरुन खरेदीखत करुन मिळणेकरिता दाखल केलेला आहे. सदर दाव्यामधील प्रतिवादी यांनी दावा मिळकतीपैकी २२ आर क्षेत्र दिनांक ०९/०३/२०१२ रोजी खरेदीखत क्र.११६६/२०१२ तसेच दावा मिळकतीपैकी ३३ आर चे क्षेत्र दस्त नं.११६२/२०११ अन्वये नोंदवुन दिले आहेत. सदरील खरेदीखत हे वादीच्या अपरोक्ष झाले असल्याने वादी याविषयी माहिती नव्हती त्यामुळे सदरच्या इसमांना दाव्यामध्ये पक्षकार म्हणुन समाविष्ट केले नव्हते. वादींचे खरेदी व्यवहार हा नविन खरेदीदारांच्या व्यवहारापुर्वीचा असल्याने तो वादींवर बंधनकारक नाही. परंतु त्यासंबंधी दाव्याचा गुणदोषावर निर्णय होत असताना सदर इसमांना दाव्यात पक्षकार म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. प्रतिवादी यांनी केवळ वादींचा हक्क नाकारण्यासाठी वाद मिळकतीपैकी काही क्षेत्र सदर प्रतिवादी यांना विक्री केल्याचे दिसते. त्यामुळे सदर लोकांना या दाव्या मध्ये प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे आवश्यक आहे. सदरचे इसम प्रतिवादी म्हणुन समाविष्ट केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही अथवा दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी सदरचा अर्ज नामंजुर केलेस वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

३. उलटपक्षी प्रतिवादी तर्फे निशाणी ८२ कडे सदर अर्जास म्हणणे देवुन सदरचा अर्ज नाकारलेले आहे. प्रतिवादी यांनी असे कथन केले आहे की, सदरचा दुरुस्तीचा अर्ज सात वर्ष विलंबाने दाखल केला असुन त्याचे योग्य कारण अर्जामध्ये नमुद नाही. वादीच्या कथनाप्रमाणे सन २०१२ साली प्रतिवादी यांनी ति–हाईत इसमांना वाद मिळकत विक्री केली तर सन २०१२ पासुन आज अखेर वादींनी दाव्यात

दुरुस्ती का केली नाही याचे कोणतेही कारण अर्जात नमुद नाही. वादी यांनी जाणीवपुर्वक दावा दुरुस्ती करण्यास विलंब केला. त्यामुळे वादी यांना दुरुस्ती मागता येणार नाही. सबब अर्ज नामंजुर करण्याची त्यांनी विनंती केली. प्रतिवादी यांनी वैकल्पीकरित्या वादी यांचा अर्ज योग्य दंडावर मंजुर करण्याविषयी चे कथन केलेले आहे.

४. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रे पडताळले. खालील मुद्दे माझ्या विचारार्थी आले असुन ते त्यांच्या कारणमिमांसा व निष्कर्षासह पुढील प्रमाणे दिले आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | वादी मागतात तशी दुरुस्ती मिळणेस पात्र आहेत का ? | ......होकारार्थी |
| २ | आदेश काय ? | अर्ज मंजुर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

५. वादीतर्फे अॅड.श्री.बी.आर.फडके यांनी असा युक्तीवाद केला आहे की, अर्ज कलम ४ मध्ये नमुद व्यक्ती सदर दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार आहेत. सदरचे व्यक्तींना प्रतिवादी म्हणुन दाव्याचे कामी समाविष्ट न केलेस वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. प्रतिवादी यांनी केवळ वादींचा हक्क नाकारण्याच्या उद्देशाने दावा चालु असताना सदर इसमांना वाद मिळकतीपैकी काही क्षेत्र विक्री केल्याचे दिसुन येते. त्यामुळे सदरचे इसम सदर दाव्यामध्ये समाविष्ट करणे आवश्यक आहे. अर्ज कलम ४ मध्ये नमुद व्यक्तींना दाव्यात समाविष्ट केल्याने दाव्याचे स्वरुप बदलत नाही. उलटपक्षी त्यामुळे न्यायदानास मदतच होणार आहे. सबब अर्ज मंजुर करण्याची त्यांनी विनंती केली.

६. प्रतिवादी तर्फे अॅड.श्री.ए.एस.कांबळे यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुतचा अर्ज केवळ दाव्याचे काम प्रलंबित करण्यासाठी दाखल केले असे दिसुन येते. वादी यांनी सुमारे सात वर्षाच्या विलंबानंतर सदरचा अर्ज दाखल केल्याचे दिसुन येते.

सदर अर्जास एवढा विलंब का झाला याचे कोणतेही कारण अर्जामध्ये नमुद नाही. त्यामुळे अर्ज नामंजुर करणेविषयी त्यांनी विनंती केली.

७. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रस्तुतचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळणेसाठी दाखल केलेला आहे. परंतु दरम्यानच्या काळात प्रतिवादी यांनी वाद मिळकतीपैकी काही क्षेत्र ति–हाईत इसमास विक्री केल्याचे दिसुन येते. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज सदर ति–हाईत खरेदीदार यांना दाव्याचे कामी प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करावे यासाठी दाखल केलेला आहे. वादींच्या कथनाप्रमाणे प्रतिवादी यांनी सन २०१२ साली वाद मिळकतीपैकी काही क्षेत्र अर्जात नमुद व्यक्तींना विक्री केलेले आहे. त्यामुळे वादी सदर इसमांना सदर कामी प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करु इच्छितात. वादीतर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, सदर इसमांना वाद मिळकतीचे क्षेत्र विक्री केल्याचे वादी यांना कळाले नाही. त्यामुळे त्यांना सदर दाव्याच्याकामी प्रतिवादी म्हणुन समाविष्ट करणे शक्य झाले नाही. परंतु वादींच्या कथनाप्रमाणेच सन २०१२ साली वाद मिळकतीचे काही क्षेत्र प्रतिवादी यांनी सदर ति–हाईत इसमांना विक्री केल्याचे दिसते. त्यामुळेच वादी यांनी एवढया उशिरा सदरचा अर्ज का दाखल केला याचे संयुक्तीक कारण देणे आवश्यक होते. वादी तर्फे असा युक्तीवाद करण्यात आला की, प्रतिवादी यांनी केवळ वादीचा हक्क नाकारण्याकरीता सदरचे क्षेत्र विक्री केल्याचे दिसते. परंतु सन २०१२ ते आज अखेर ते अर्ज दाखल तारखेपर्यंत वादी यांनी सदर इसमांना दाव्याचे कामी समाविष्ट करणेबाबत कोणतीही तजविज का केली नाही याचे कोणतेही संयुक्तीक कारण अर्जात दिलेले नाही.

८. प्रस्तुतचा दावा हा साठेखतावरुन खरेदीखत करुन मिळण्याकरीता दाखल केलेला आहे. वादी मागतात तशी दुरुस्ती केल्याने प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होत नाही. उलटपक्षी प्रतिवादी यांनी दावा प्रलंबित असताना वाद मिळकतीमधील काही क्षेत्र विक्री केल्याचे दिसते. सदर ति–हाईत इसमांना दाव्याचे कामी समाविष्ट करणे आवश्यक आहे. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होत नाही. उलटपक्षी सदरचे इसम दाव्यात समाविष्ट न केल्याने वादी यांचे अपरिमित असे नुकसान होणार आहे. वादी यांनी जरी सात वर्षाच्या विलंबाने अर्ज दिला असला तरी देखील

न्यायादानाचे दृष्टीने सदरचा अर्ज योग्य त्या द्रव्य दंडावर मंजुर करणे आवश्यक आहे. सबब मुद्दा क्र.१ चे उत्तर होकारार्थी असुन मुद्दा क्र. २ च्या उत्तराकरीता खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

१. अर्ज रक्कम रुपये ५००/– च्या द्रव्य दंडावर मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी अर्ज कलम ४ मध्ये नमुद केल्याप्रमाणे दुरुस्ती विहित मुदतीत करण्याची आहे, तसे न केल्यास सदरचा आदेश रद्द समजण्यात येईल.

दौंड
दिनांक – १७.०८.२०१९

**(ए.ए.कळमकर)**
३रे सह दिवाणी न्यायालय दौंड ,
जिल्हा पुणे

CERTIFIED

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment is same word for word as per original Judgment.

| | |
|---|---|
| Name of Steno | :T.R.Bagwan |
| Court Name | : A.A.KALAMKAR |
| | : 3rd Joint Civil Judge, Jr.Dvn. Daund. |
| Date of Judgment | : 17.08.2019 |
| Judg. signed by P. O. | : 17.08.2019 |
| Uploaded on | : 17.08.2019 |